# प्रेस नोट दि. १७/०४/२०२५

**आरोपी लोकसेवक श्री. नितीन उषा संपत उबाळे, वय-४६ वर्षे, व्यवसाय - नोकरी - सहायक आयुक्त, समाज कल्याण सांगली, वर्ग-१ यांनी तक्रारदार यांचेकडून ४०,०००/- रूपये लाचेची मागणी करून ४०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली विभागाची कारवाई**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **सांगली** |
| **पोलीस स्टेशन** | सांगली शहर पोलीस ठाणे, जि.सांगली |
| **गुन्हा नोंद क्रमांक व कलम** | गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे. |
| **तक्रारदार** | पुरुष वय ३० वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नांव व कार्यालय** | श्री. नितीन उषा संपत उबाळे, वय-४६ वर्षे, व्यवसाय - नोकरी - सहायक आयुक्त, समाज कल्याण सांगली, वर्ग-१, सध्या रा. खरे क्लब हाऊस, साफल्य बंगला, विश्रामबाग सांगली, मुळ रा. लक्ष्मी हौसींग सोसायटी, ट्रॅगंल चाळीच्या पाठीमागे साखरवाडी, ता.फलटण, जि.सातारा |
| **पडताळणी कारवाई वेळी मागणी केलेली लाचेची रक्कम व दिनांक** | ४०,०००/- (चाळीस हजार) रुपये लाचेची मागणी<br>दि.१६.०४.२०२५ रोजी आलोसे यांचे कक्षामध्ये |
| **सापळा कारवाई वेळी स्विकारलेली लाचेची रक्कम** | ४०,०००/- (चाळीस हजार) रुपये लाचेची मागणी |
| **सापळा कारवाई दिनांक व ठिकाण** | दि.१७/०४/२०२५ रोजी समाज कल्याण, सांगली येथे आलोसे यांचे कक्षामध्ये |
| **थोडक्यात हकीकत** | यातील तक्रारदार यांचे बचत गट यांनी घेतलेल्या टेंडरचे बिल मंजूर केलेच्या मोबदल्यात यातील आरोपी लोकसेवक श्री. नितीन उबाळे, सहायक आयुक्त समाज कल्याण सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे १० टक्के प्रमाणे लाचेची मागणी केलेबाबतचा अर्ज तक्रारदार यांनी दि.१६.०४.२०२५ रोजी पथकास दिला होता.<br>तक्रारदार यांनी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने दि.१६.०४.२०२५ रोजी आलोसे नितीन उबाळे, सहायक आयुक्त यांचेकडे पडताळणी केली असता, आलोसे यांनी तक्रारदार यांचे बचत गटाचे ८,१२,०००/- रूपयांचे बिल मंजुर केलेचे मोबदल्यात मंजुर बिल रक्कमेच्या १० टक्के प्रमाणे लाचेची मागणी करून तडजोडी अंती ५ टक्के प्रमाणे ४०,०००/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम दि. १७.०४.२०२५ रोजी देण्यास सांगितले होते.<br>त्यानंतर दि. १७.०४.२०२५ रोजीचे सापळा कारवाई वेळी यातील आलोसे यांनी त्यांचे कक्षामध्ये तक्रारदार यांचेकडून ४०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.<br>त्या अनुषंगाने आलोसे श्री. नितीन उबाळे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सांगली वर्ग-१ यांचेविरूध्द सांगली शहर पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे. |
| **तपास अधिकारी** | श्री. उमेश दा. पाटील, पोलीस उप अधीक्षक ला. प्र. वि. सांगली |
| **मार्गदर्शन अधिकारी** | पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे,<br>अपर पोलीस अधीक्षक डॉ. शितल जानवे,<br>अपर पोलीस अधीक्षक श्री.विजय चौधरी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे |
| **सापळा पथक** | श्री.उमेश पाटील, पोलीस उप अधीक्षक, सांगली, पोलीस निरीक्षक, श्री किशोर कुमार खाडे, पोलीस निरीक्षक श्री.विनायक भिलारे तसेच पोलीस अंमलदार प्रीतम चौगुले, अजित पाटील, सलीम मकानदार, ऋषिकेश बडणीकर, पोपट पाटील, उमेश जाधव, धनंजय खाडे, सीमा माने, सुदर्शन पाटील, अतुल मोरे, चंद्रकांत जाधव, विणा जाधव |

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप व मोबाईल नंबर ९५५२५३९८८९ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

**संपर्क :-**

1) **मोबाईल ॲप** - www.acbmaharashtra.net
2) **फेसबुक पेज** - www.facebook.com-maharashtraACB
3) **वेबसाईट** – www.acbmaharashtra.gov.in

**(उमेश दा.पाटील)**
**पोलीस उप अधीक्षक**
ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली

Scanned with OKEN Scanner